# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

## कार्यपत्रिका क्रमांक- २३५

**(सभावृत्तांत)**

**दिनांक- ११/०८/२०२१** **वेळ – दु.२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा बुधवार, दिनांक **११/०८/२०२१** रोजी **दु.०२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील मा.सभापती, स्थायी समिती यांचे दालनातून मा.सभापती, स्थायी समिती हे मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० व २८ जून २०२१ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) सभा संचलित केली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा.सदस्य ऑनलाईन व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे उपस्थित होते.

१. **मा.अॅड. नितीन ज्ञानेश्वर लांडगे– सभापती**
२. मा. कदम शशिकांत गणपत
३. मा. कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
४. मा. संतोष बबन कांबळे
५. मा. अभिषेक गोविंद बारणे
६. मा. बुर्डे सुवर्णा विकास
७. मा. फुगे भिमाबाई पोपट
८. मा. पोर्णिमा रविंद्र(आप्पा) सोनवणे
९. मा. सुलक्षणा राजू धर
१०. मा. भोईर सुरेश शिवाजी
११. मा. बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
१२. मा. यादव मीनल विशाल
१३. मा. भालेकर प्रविण महादेव
१४. मा. बनसोडे राजू विश्वनाथ
१५. मा.पाडाळे निता विलास

याशिवाय मा.राजेश पाटील- आयुक्त, मा.विकास ढाकणे- अति.आयुक्त(१), मा.उल्हास जगताप- नगरसचिव तथा अतिरिक्त आयुक्त(३), मा.कुंभोजकर- मुख्य लेखा परिक्षक, मा.राजन पाटिल- शहर अभियंता, मा.नाळे- उपसंचालक नगररचना, मा.कोळंबे- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.इंगळे, मा.चारठाणकर, मा.दुरगुडे, मा.झगडे, मा.लोणकर, मा.खोत- उप आयुक्त, मा.निकम, मा.भालकर, मा.इंगळे- सह शहर अभियंता, मा.लडकत- प्र.सह शहर अभियंता

मा.देशमुख, मा.बोदडे, मा.गायकवाड- सहाय्यक आयुक्त, मा.शिंदे- प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण), मा.पोमण- मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.साळवे- अति. आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.मोरे, मा.सेठिया, मा.देशमुख मा.देसले- कार्यकारी अभियंता, मा.देशमुख- प्रशासन अधिकारी, मा.जरांडे- सुरक्षा अधिकारी, मा.गोफणे- आरोग्य अधिकारी हे अधिकारी उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले.**

विषय क्र. २८) भाडे माफ करणेबाबत- मा. फुगे भिमाबाई व मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र. २९) डायलिसीस सेंटर साठी जागा, पाणी व लाईट उपलब्ध करुन देणेबाबत- मा. फुगे भिमाबाई व मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र. ३०) मुदतवाढ करणेबाबत- मा. फुगे भिमाबाई व मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र. ३१) स्थापत्य इ क्षेत्रीय कार्यालयाकडील सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकातील कामांच्या तरतुदी मध्ये वाढ/ घट करणे बाबत- मा. फुगे भिमाबाई व मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र. ३२) मा. स्थायी समिती ठराव क्र.१००५० दि.०४/०८/२०२१ मधील विषय क्र.१८ मध्ये दुरुस्ती करणेबाबत- मा. फुगे भिमाबाई व मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र. ३३) स्थापत्य अ प्रभाग या विभागाकडील सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकातील विकास कामांच्या तरतुदीमध्ये वाढ/ घट करणेबाबत.

विषय क्र. ३४) सुरक्षा विभागाकडील अधिकारी/कर्मचारी यांना माहे १ एप्रिल २०२१ पासुन ३० जून २०२१ अखेर दरमहा कोविड भत्ता अदा करणेबाबत- मा. फुगे भिमाबाई व मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र. ३५) सुरक्षा रक्षक नेमणेबाबत- मा. फुगे भिमाबाई व मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र. ३६) गाळे वितरीत करणेबाबत- मा.राजू बनसोडे व मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र. ३७) मौजे पिंपळे गुरव येथील स.नं.५१ पै काटे पुरम ते कृष्णा या १८ मी. रुंद रस्त्याने बाधित होणा-या मिळकतीची शासकिय मोजणी करणेबाबत- मा.अंबरनाथ कांबळे व मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र. ३८) सांगवी- बोपोडी मुळा नदीवर नवीन पूल बांधणे बाबत.

विषय क्र. ३९) प्रकल्पातील लाभार्थ्यांना स्वहिस्सा भरण्यास मुदतवाढ देणेबाबत- मा. फुगे भिमाबाई व मा. सुवर्णा बुर्डे यांचा प्रस्ताव.

विषय क्र. ४०) प्रभाग क्र. २३ थेरगाव मधील खालील नमूद कामांना मनपाचे पॅनलवरील प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार व वास्तुविशारद मे सावन जगदाळे ॲन्ड असोसिएट्स यांची नेमणुक करणेबाबत- मा. अभिषेक बारणे व मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव.

------------

मा.स्थायी समिती सभा कार्यपत्रिका क्र.२३४ दि.०४/०८/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

------------

ठराव क्रमांक- १०१०१ विषय क्रमांक- ०१

दिनांक- ११/०८/२०२१ विभाग- स्थापत्य क मुख्यालय

सुचक- मा. शत्रुघ्न काटे अनुमोदक- मा. भोईर सुरेश

संदर्भ- मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/८१५/२०२१, दि.१६/०७/२०२१.

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे.

विषय- प्रभाग क्र.६ मध्ये पूर्व भागात खडडे व चरांची डांबरीकरणाचे सुधारणा करणे.

विषय क्र.१ चा विचार दि.२५/०८/२०२१ च्या सभेच्यावेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१०२ विषय क्रमांक- ०२

दिनांक- ११/०८/२०२१ विभाग- विद्युत मुख्यालय

सुचक- मा. शत्रुघ्न काटे अनुमोदक- मा. भोईर सुरेश

संदर्भ- मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.विमुका/८/कावि/३४९/२०२१, दि.१६/०७/२०२१

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या विद्युत विभागाकडील निविदा क्र.१२/०१-२०२०-२१ मनपाच्या ग प्रभागातील थेरगाव येथील नविन व पिंपरी येथील जिजामाता हॉस्पिटल मध्ये कोरोना वार्ड करीता आय.सी.यु.मध्ये यु.पी.एस. यंत्रणा बसविणेबाबत रियल इलेक्ट्रिकल्स नि.र.रू.४९,७१,६१०/-(अक्षरी र.रू.एकोणपन्नास लाख एकाहत्तर हजार सहाशे दहा रुपये फक्त) पेक्षा १६.२०% कमी या ठेकेदाराकडुन काम करून घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१०३ विषय क्रमांक- ०३

दिनांक- ११/०८/२०२१ विभाग- उद्यान

सुचक- मा. शत्रुघ्न काटे अनुमोदक- मा. भोईर सुरेश

संदर्भ- मा.अति आयुक्त यांचे पत्र क्र.उद्यान/२/कावि/४८३/२०२१, दि.१९/०७/२०२१.

मा. अति आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाचे उद्यान विभागामार्फत निविदाद्वारे उद्यान देखभाल संरक्षण काम करारनामा करून वेळोवेळी कामकाज करून आदेश देऊन कामे करून घेणेत येतात.सदरचा कालावधी दोन वर्षाचा असतो. कामकाजाच्या सोईच्या दृष्टिने सर्व उद्यानांची देखभाल कामाची निविदा एकाच वेळी दोन वर्ष कालावधीसाठी क्षेत्रीय कार्यालयानुसार निविदा प्रस्तावीत करणेत आलेल्या होत्या यामध्ये मोठी उद्याने वगळुन उर्वरीत ११५ उद्यानांसाठी साधारण २३ निविदा व रस्ते सुशोभिकरण देखभालीसाठी ९

निविदा प्रस्तावित करणेत आल्या होत्या. कोरोणा विषाणुच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे कर्मचारी उपस्थीतीवर निर्बंध असल्यामुळे व काही निविदा कोर्टामध्ये असल्यामुळे विलंब झाला आहे. सदरच्या निविदा कार्यवाही पुर्ण झालेली आहे.काही निविदांची कार्यवाही चालु आहे. तथापी प्रस्तावात नमुद केलेल्या उद्यान कामाची मुदत साधारण एप्रिल २०२१ मध्ये संपलेली आहे. देखभाल कामात खंड पडून देता नाही. सोबतचे प्रपत्र अ मधील १ ते १९ उद्याने/रस्ते देखभाल कालावधी एप्रिल २०२१ पर्यंत मूदत व काही उद्यानांची मुदत मे, जुन २०२१ अखेर असून काही निविदा कोर्टामध्ये असल्यामुळे विलंब झाला आहे त्यामधील उद्यानांसाठी सप्टेंबर २०२१ अखेर मुदतवाढ देणे आवश्यक असून त्याप्रमाणे प्रपत्र अ सोबत येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१०४ विषय क्रमांक- ०४

दिनांक- ११/०८/२०२१ विभाग- ड क्षेत्रिय स्थापत्य

सुचक- मा. शत्रुघ्न काटे अनुमोदक- मा. भोईर सुरेश

संदर्भ- मा.अति आयुक्त यांचे पत्र क्र.डक्षे/स्था/ कावि/५९१/२०२१, दि.१६/०७/२०२१

मा. अति आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

ड क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील स्थापत्य विभागाअंतर्गतप्रभाग क्र.२९ पिंपळे गुरव येथीलखालील नमुद विकास कामे करणेसाठी निविदा पुर्व व निविदा पश्र्चात प्रकल्प सल्लागार नेमणूक करणेसाठी अशा प्रकारचे काम करणा-या व पिंपरी चिंचवड मधील नोंदणीकृत प्रकल्प सल्लागार यांचेकडून दि.११/०५/२०२१ ते दि.२१/०५/२०२१ चे कालावधी ई-कोटेशन नोटीस क्र.DZone/455/2021-22, दि.11/05/2021 अन्वये सीलबंद दरपत्रक मागविणेत आले होते. प्राप्त सल्लागारांची सूची तयार करून तुलनात्मक दर काढले असता खालील सल्लागारांचे दर/ फी लघुत्तम आहेत त्यास अनुसरून खालील प्रमाणे कामांना सल्लागार नेमणुक करणेकामी मंजुरी आवश्यक आहे.

| अनु क्र. | कामाचे नाव | लघुत्तम सल्लागाराचे नाव | कोटेशन सल्लागार फी / प्राप्त दर |
|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.२९ पिंपळे गुरव परिसरातील जवळकरनगर व इतर परिसरातील रस्ते आवश्यकतेनुसार कॉक्रीटीकरण करणे. | M/s. CREATIONS ENGINEERS PVT. LTD., PUNE | 1.94% |

तरी सदर तक्त्यामधील नमूद केलेल्या प्रकल्पांना प्रकल्प सल्लागार म्हणून सल्लागार नेमणेकामी व त्यांना अदा करावयाच्या फी च्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१०५ विषय क्रमांक- ०५

दिनांक- ११/०८/२०२१ विभाग- ड क्षेत्रिय स्थापत्य

सुचक- मा. शत्रुघ्न काटे अनुमोदक- मा. भोईर सुरेश

संदर्भ- मा.अति आयुक्त यांचे पत्र क्र.डक्षे/स्था/ कावि/५८९/२०२१, दि.१६/०७/२०२१

मा. अति आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

ड क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील स्थापत्य विभागाअंतर्गत प्रभाग क्र.२८ पिंपळे सौदागर येथीलखालील नमुद विकास कामे करणेसाठी निविदा पुर्व व निविदा पश्र्चात प्रकल्प सल्लागार नेमणूक करणेसाठी अशा प्रकारचे काम करणा-या व पिंपरी चिंचवड मधील नोंदणीकृत प्रकल्प सल्लागार यांचेकडून दि.११/०५/२०२१ ते दि.२१/०५/२०२१ चे कालावधी ई-कोटेशन नोटीस क्र.DZone/455/2021-22, दि.11/05/2021 अन्वये सीलबंद दरपत्रक मागविणेत आले होते. प्राप्त सल्लागारांची सुची तयार करून तुलनात्मक दर काढले असता खालील सल्लागारांचे दर/ फी लघुत्तम आहेत त्यास अनुसरून खालील प्रमाणे कामांना सल्लागार नेमणुक करणेकामी मंजुरी आवश्यक आहे.

| अनु क्र. | कामाचे नाव | लघुत्तम सल्लागाराचे नाव | कोटेशन सल्लागार फी / प्राप्त दर |
|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.२८ पिंपळे सौदागर येथील कापसे लॉन जवळील १२.०० मी. रूंद डी.पी. रस्त्याचे अद्यावत पध्दतीने कॉंक्रीटीकरण करणे. | M/s. EXCELTECH CONSULTANCY & PROJECTS PVT. LTD. | 1.86% |

तरी सदर तक्त्यामधील नमूद केलेल्या प्रकल्पांना प्रकल्प सल्लागार म्हणून सल्लागार नेमणेकामी व त्यांना अदा करावयाच्या फी च्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१०६ विषय क्रमांक- ०६

दिनांक- ११/०८/२०२१ विभाग- स्थापत्य क मुख्या

सुचक- मा. अभिषेक बारणे अनुमोदक- मा. भिमाबाई फुगे

संदर्भ- मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र. स्था/नि/ क- मुख्य/७८७/२०२१, दि.०२/०७/२०२१

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.69/13/2020-21 अन्वये प्रभाग क्र.६ मधील सदगुरुनगर, लांडगेवस्ती व परिसरात पावसाळी गटरची सुधारणा करणेकामी मे. त्रिशुल एन्टरप्रायझेस नि.र.रू.44,99,287/- (अक्षरी र.रु.चव्वेचाळीस लाख नव्व्यान्नव हजार दोनशे सत्त्याऐंशी फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.44,62,487/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.44,62,487/- पेक्षा 31.99% कमी म्हणजेच र.रु.30,34,937/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.35,758/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.36,800/- = एकुण र.रु.31,07,495/- (अक्षरी र.रू.एकतीस लाख सात हजार चारशे पंच्यान्नव

फक्त) पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१०७ विषय क्रमांक- ०७

दिनांक- ११/०८/२०२१ विभाग- उद्यान / वृक्षसंवर्धन

सुचक- मा. अभिषेक बारणे अनुमोदक- मा. भिमाबाई फुगे

संदर्भ- मा.उप आयुक्त यांचे पत्र क्र. उद्यान/४/कावि/३९६/२०२१, दि.२३/०७/२०२१

मा.उप आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाचे वृक्षसंवर्धन विभागाकडील निविदा नोटीस क्र.०४/२०२१-२२ मधील मनपाचे जाधववाडी परीसरातील प्रभाग क्र.२ मधील विविध रस्ते मध्यदुभाजक सुशोभिकरण करणे व २ वर्षे देखभाल करणे कामाबाबत मे.अथर्व स्वयं. औद्यो. सेवा सह संस्था मर्या. निविदा र.रू.४९,१४,९२५/- (अक्षरी र.रू.एकोणपन्नास लाख चौदा हजार नऊशे पंचवीस फक्त) मधुन रॉयल्टी चार्जेस वगळुन र.रू.४७,१९,८७७/- वर दर मागविणेत आले होते. त्यानुसार सदर काम उपरोक्त निविदाकाराकडुन र.रू.४७,१९,८७७/- पेक्षा -७.०० टक्के ने कमी र.रू.४३,८९,४८६/- + रॉयल्टी चार्जेस र.रू.१,९५,०४८/- असे एकुण र.रू.४५,८४,५३४/- पर्यंत काम करून घेणस व स्वीकृत करुन निविदेतील नियम अटी/शर्तीस अधिन राहुन करारनामा करुन काम करुन घेणेस व येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १०१०८ विषय क्रमांक – ०८

दिनांक – ११/०८/२०२१ विभाग –स्थापत्य क मुख्यालय

सुचक- मा. अभिषेक बारणे अनुमोदक- मा. भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. स्था/नि/क-मुख्य/८१९/२०२१, दि.२३/०७/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

विषय – पिंपरी येथील कै. अण्णासाहेब मगर स्टेडियम समोरील इमारतीमध्ये मे. कोर्टासाठी फर्निचर व इतर स्थापत्य विषयक कामे करणे.

विषय क्र.८ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १०१०९ विषय क्रमांक – ०९

दिनांक – ११/०८/२०२१ विभाग – मुख्य लेखा परिक्षक

सुचक- मा. अभिषेक बारणे अनुमोदक- मा. भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे पत्र क्र.मुलेप/१अ/कावि/९३/२०२१, दि.०४/०८/२०२१

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केले प्रमाणे.

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागाकडील माहे मार्च २०२१ मधील अद्यावत एकूण कामकाज गोषवारा अहवालाचे अवलोकन करण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १०११० विषय क्रमांक – १०

दिनांक – ११/०८/२०२१ विभाग – शिक्षण

सुचक- मा. अभिषेक बारणे अनुमोदक- मा. भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र. शि.मं./कावि/९अ/९२/२०२१, दि.०४/०८/२०२१

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मनपा शाळा कोविड १९ प्रादुर्भावामुळे बंद असलेकारणाने मुख्यध्यापक व शिक्षकांनी ऑनलाईन अध्यापन केलेले असून या उपक्रमाचा माहितीदर्शक पुस्तिका श्री.विलास पाटील पद पर्यवेक्षक यांनी वेळोवेळी मे.कृष्णा प्रिंटर्स व स्टेशनरी, पुणे २० यांचेकडून खरेदी केलेले आहे. सदर कार्यपुस्तिका खरेदीपोटी र.रू.१७,९३६/- इतका खर्च श्री.विलास पाटील पद पर्यवेक्षक यांनी केलेला आहे. तरी, 'शाळा लॉक तरीही शिक्षण अनलॉक' या कार्यपुस्तिकेच्या बिलापोटी झालेला खर्च र.रू.१७,९३६/- (अक्षरी र.रू.सतरा हजार नऊशे छत्तीस फक्त) श्री.विलास पाटील यांना अदा करणेस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१११ विषय क्रमांक- ११

दिनांक- ११/०८/२०२१ विभाग- मध्यवर्ती भांडार

सुचक- मा. अंबरनाथ कांबळे अनुमोदक- मा. अभिषेक बारणे

संदर्भ- मा.उप आयुक्त यांचे पत्र क्र. सभां/०५/कावि/११०७/२०२१, दि.२९/०७/२०२१

मा.उप आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या शिक्षण विभागाने मागणी केलेनुसार इयत्ता 5 वी व 8 वी च्या शिष्यवृत्ती परिक्षेकरिता आवश्यक शिष्यवृत्ती मार्गदर्शिका व सराव प्रश्नसंच खरेदी करुन वाटप करणेकामी ई.नि.सु.क्र.01/2021-22 अन्वये मे.नर्मदा प्रकाशन, कोल्हापुर यांनी दर कमी करुन सादर केलेली निविदा लघुत्तम प्राप्त झाली असुन शिक्षण विभागाने दिलेल्या सुधारित परिमाणानुसार एकूण

र.रु.9,05,555/- इतका खर्च होणार असुन जो सुधारित अंदाजित खर्च एकूण र.रु.9,84,869/- पेक्षा 8.05% ने कमी असुन स्विकृत करण्यात आलेला असुन त्यांच्या समवेत करारनामा करून पुरवठा आदेश निर्गत करण्यात आलेला असल्याने सदर पुस्तके खरेदी करणेकामी हॊणारा खर्च एकूण र.रु.9,05,555/- (अक्षरी र.रू.नऊ लाख पाच हजार पाचशे पंचावन्न फक्त) चे अवलोकन करण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १०११२ विषय क्रमांक – १२

दिनांक – ११/०८/२०२१ विभाग – ड क्षेत्रिय स्थापत्य

सुचक- मा. अंबरनाथ कांबळे अनुमोदक- मा. अभिषेक बारणे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र. डक्षे/स्था/कावि/६०६/२०२१, दि.२९/०७/२०२१

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे.

ड क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील स्थापत्य विभागाअंतर्गत प्रभाग क्र.२९ पिंपळे गुरव येथील प्रस्तावात नमुद विकास कामे करणेसाठी निविदा पुर्व व निविदा पश्र्चात आर्किटेक्ट/ प्रकल्प सल्लागार नेमणूक करणेसाठी अशा प्रकारचे काम करणा-या व पिंपरी चिचंवड मधील नोंदणीकृत प्रकल्प सल्लागार यांचेकडून दि.०६/०५/२०२१ ते दि.१२/०५/२०२१ चे कालावधी ई-कोटेशन नोटीस क्र.DZone/448/2020-21, दि.06/05/2021 अन्वये सीलबंद दरपत्रक मागविणेत आले होते. प्राप्त सल्लागारांची सूची तयार करून तुलनात्मक दर काढले असता खालील सल्लागारांचे दर/ फी लघुत्तम आहेत त्यास अनुसरून खालील प्रमाणे कामांना सल्लागार नेमणुक करणेकामी मंजुरी आवश्यक आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | लघुत्तम सल्लागाराचे नाव | कोटेशन सल्लागार फी / प्राप्त दर |
|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.२९ पिंपळे गुरव येथील बसस्टॉपजवळील मनपाच्या माध्यमिकशाळा इमारतीत पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी इनोव्हेशन सेंटर तयार करणे | M/s. ACTUAL ARCHITECTRE | 1.98% |

तरी सदर तक्त्यामधील नमूद केलेल्या प्रकल्पांना प्रकल्प सल्लागार म्हणून सल्लागार नेमणेकामी व त्यांना अदा करावयाच्या फी च्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १०११३ विषय क्रमांक – १३

दिनांक – ११/०८/२०२१ विभाग – फ क्षेत्रिय विद्युत

सुचक- मा. अंबरनाथ कांबळे अनुमोदक- मा. अभिषेक बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. फक्षेका/वि/२/कावि/२६४/२०२१, दि.२८/०७/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

फ क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत विद्युत मुख्यालयाकडील प्रस्तावात नमूद कामांना तरतूद अपुरी असल्याने सदरची कामे अंतिम करणेस अडचणी निर्माण झाल्या आहेत. सदर कामांना लागणारी तरतूद फ क्षेत्रिय विद्युत मुख्यालयाकडील कामावरील उपलब्ध तरतूद वर्गीकरण केल्यास विद्युत फ क्षेत्रिय कार्यालयाकडील कामे पूर्ण करताना व अंतिम करताना अडचणी दूर होणार आहेत. तरी तरतुद वर्गीकरणाची तातडीची आवश्यकता विचारात घेता र.रु.२२,९३,०००/- (अक्षरी र.रू.बावीस लाख त्र्यान्नव हजार फक्त) चे तरतूद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रू.२२,९३,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १०११४ विषय क्रमांक – १४

दिनांक – ११/०८/२०२१ विभाग – विद्युत मुख्य

सुचक- मा. अंबरनाथ कांबळे अनुमोदक- मा. अभिषेक बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वि/मु.पु.रस्ता./कावि/२७०/२०२१, दि.२६/०७/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

विद्युत मुख्य कार्यालय विभागाचे भांडवली अंदाजपत्रकातील "स्थापत्य प्रकल्प अंतर्गत विद्युत विषयक कामे" या लेखाशिर्षांतर्गत भक्ति-शक्ती चौक येथे ग्रेड सेपरेटर व उड्डानपुलाचे दिवाबत्ती व्यवस्था करणे व विद्युत विषयक कामे करणे या कामासाठी सन २०२१-२०२२ चे अंदाजपत्रकात मूळ तरतूद र.रू.१,४०,००,०००/- इतकी आहे. सदर कामास या आर्थिक वर्षात खर्च र.रू.४३,०२,९६९/- इतका झाला असून सदर कामाचा एकूण खर्च अंदाजे र.रू.३,२०,००,०००/- इतका आपेक्षित आहे. सदर चालू कामास तरतूदीची आवश्यकता असल्याने प्रस्तावात नमूद प्रमाणे वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रू.१,८०,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १०११५ विषय क्रमांक – १५

दिनांक – ११/०८/२०२१ विभाग – झोनिपू स्थापत्य

सुचक- मा. अंबरनाथ कांबळे अनुमोदक- मा. अभिषेक बारणे

संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/२-ब/९४७/२०२१, दि.३०/०७/२०२१

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या झोनिपू स्थापत्य विभागाकडील प्रस्तावासोबतच्या प्रपत्र अ (1 ते 14) मधील कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे संबंधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १०११६ विषय क्रमांक – १६

दिनांक – ११/०८/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा. सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा. संतोष कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.सभां/०४/कावि/४३९/२०२१, दि.०२/०८/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाचे आरोग्य विभागास वाय.सी.एम.रूग्णालयाकरीता दैनंदीन कामकाजासाठी, निर्जंतुकीकरणसाठी बॅक्टोडेक्स जंतुनाशक/दुर्गंधीनाशक औषध खरेदी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 73 (क) अनुसुचि ड प्रकरण 5 क्रमांक (2) (2) नुसार निविदा न मागविता, थेट पध्दतीने M/s Unilab Chemicals and Pharmaceuticals Pvt Ltd.मुंबई या उत्पादित कंपनीकडुन बॅक्टोडेक्स जंतुनाशक/दुर्गंधीनाशक औषध10,090 लिटर खरेदीकामी र.रु.1370/- प्रती लिटर दरानुसार एकुण र.रु.1,38,23,300/- (अक्षरी र.रु.एक कोटी अडोतीस लाख तेवीस हजार तीनशे फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १०११७ विषय क्रमांक – १७

दिनांक – ११/०८/२०२१ विभाग – स्थापत्य BRTS

सुचक – मा. सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा. संतोष कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/BRTS/५७०/२०२१, दि.०२/०८/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.13/01/2021-2022 अन्वये कासारवाडी येथे 30 मी. HCMTR रस्त्यावर सी.डी.वर्क बांधणेकामी मे.टी अँड टी इन्फ्रा लि. नि.र.रू.7,43,20,189/-

(अक्षरी र.रु.सात कोटी त्रेचाळीस लाख वीस हजार एकशे एकोणनव्वद फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.7,42,98,139/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.7,42,98,139/- पेक्षा 27.00% कमी म्हणजेच र.रु.5,42,37,641/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.20,46,384/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.22,050/- = एकुण र.रु.5,63,06,075/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १०११८ विषय क्रमांक – १८

दिनांक – ११/०८/२०२१ विभाग – वैद्यकीय

सुचक – मा. सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा. संतोष कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/४/कावि/६८६/२०२१, दि.०२/०८/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये प्रथम टप्प्यामध्ये कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता खाजगी कोविड केअर सेंटर चालु करण्याचा निर्णय मा.आयुक्त यांचे दिनांक ०८.०७.२०२० चे मान्य प्रस्तावान्वये घेणेत आला. या प्रमाणे Expression Of Interest (EOI) क्र.०३/२०२०-२१ प्रसीध्द करणेत आला होता. सदर EOI बी वर्गवारी साठी प्रसीध्द करणेत आला होता त्यामध्ये संबंधीत संस्था/ रुग्णालयांकडुन फक्त कर्मचारी पुरविणेकामी कळविले होते. या EOI मधील अटी शर्ती प्रमाणे The Minimum payment guaranteed shall be 80% occupancy irrespective of actual occupancy. For occupancy above 80% actual occupancy charges shall be payable. या प्रमाणे नमूद करण्यात आले होते. मे.आयकॉन हॉस्पिटल यांना तातडीची बाब म्हणुन चिखली येथील घरकुल इमारत एफ– १९येथील कोविड सेंटर दि.२९.०६.२०२१ ते१३.०७.२०२१ पर्यंत (१५दिवस) २०० बेड साठी र.रु.१६,२९,०००/- आणि दि.१४.०७.२०२१ ते २८.०७.२०२१ पर्यंत र.रु.८,१४,५००/- असे एकत्रीत र.रु.२४,४३,५००/- साठी कोविड केअर सेंटर चालविणेस देणेबाबत र.रु.५४३/- प्रतिदिन प्रति बेड या प्रमाणे मुदतवाढीसाठीचे आदेश देणेत आलेले खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १०११९ विषय क्रमांक – १९

दिनांक – ११/०८/२०२१ विभाग- मध्यवर्ती साहित्य भांडार, वैद्यकीय

सुचक – मा. सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा. संतोष कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/८८२/२०२१, दि.३०/०७/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

विषय – मे.ब्रिक्स इंडीया प्रा लि.यांना २ महिने कालावधी करीता मुदतवाढ देणेबाबत.

विषय क्र.१९ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १०१२० विषय क्रमांक – २०

दिनांक – ११/०८/२०२१ विभाग – जशुके से.२३

सुचक – मा. सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा. संतोष कांबळे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र. जशुके/वि/०४/२३७/२०२१, दि.०४/०८/२०२१

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड म.न.पा. पाणीपुरवठा विभागामार्फत आंद्रा भामा-आसखेड प्रकल्पांतर्गत चिखली येथे जलशुद्धीकरण कैंद्र उभारणेत येत आहे. सदर जलशुद्धीकरण कैंद्रामधील फिल्टर यंत्रणा, केमिकल विभाग, पाणी निवळण यंत्रणा (CLF) इ. ठिकाणी विजेवर चालणा-या विविध यंत्रणा बसविणेत येणार आहेत. तसेच सदर ठिकाणी शुद्ध पाणी साठवण टाकीवर ३.३KV या उच्चदाबावर चालणा-या पंपिंग मशिनरी बसवून सदर पिण्याचे पाणी शहरातील विविध ठिकाणी पाणीवितरण व्यवस्था कार्यान्वित करणेत येणार आहे. सदर कामांतर्गत चिखली जलशुद्धीकरण कैंद्रासाठी २००० KVA इतका वीजभाराची मागणी केलेली आहे. तसेच तळवडे बंधारा या ठिकाणी नदीजल उपसा कैंद्राची उभारणी करणेत येत असून तेथील उच्चदाबावर चालणा-या पंपिंग मशिनरी व अन्य बाबींसाठी वीजभार १५०० KVA याप्रमाणे मागणी करणेत आलेली आहे. वरील दोन्ही प्रकल्पासाठी एकत्रित वीजभार ३५०० KVA इतका मंजूर करणेत आलेला असून त्यासाठी भोसरी विजग्रहण कैंद्र येथून वीजपुरवठा भूमिगत वाहिन्यांद्वारे आणावे लागणार आहे. एकत्रित ३५०० KVA वीजभार जोडणीसाठी विजग्रहण कैंद्रामध्ये मनपामार्फत बे-ब्रेकरची उभारणी करणेबाबत म.रा.वि.पारेषण कंपनीने त्यांचेकडील पत्र क्र.CE/EHV/PC/O&M/ZONE/PUNE/TECH/1008 दि.9/7/2021 अन्वये कळविणेत आहे. तसेच त्यांचेकडील पे-ऑर्डर क्र.SE/EHV/O&M/CIRCLE/PN /1082 दि.14/7/2021 नुसार बे-ब्रेकर यंत्रणा उभारणीच्या कामापोटी पर्यवेक्षण शुल्क र.रू.१,६५,८००/- म.रा.वि.पारेषण कं. कडे अदा करणेबाबत कळविले आहे. तरी म.न.पा. चे जलशुद्धीकरण कैंद्र चिखली या ठिकाणी २००० KVA व तसेच तळवडे बंधारा या ठिकाणी नदीजल उपसा कैंद्रासाठी १५०० KVA इतका वीजभार असे

एकूण ३५०० KVA वीजभार भोसरी विजग्रहण केंद्र येथून जोडणी करणेसाठी बे-ब्रेकर यंत्रणा उभारणीच्या कामाचे पर्यवेक्षण शुल्क र.रू.१,६५,८००/- म.रा.वि.पारेषण कं. यांना अदा करणे आवश्यक आहे. सदरचा खर्च हा जलशुद्धीकरण केंद्र, से.२३ विद्युत या विभागाकडील "पंपिंग स्टेशन वीजबिले" या लेखाशिर्षावरून खर्ची टाकणेत यावा. सबब सदर नविन जलशुद्धीकरण केंद्र चिखली येथे वीजजोडणी घेणेकरीता म.रा.वि. पारेषण कं. च्या भोसरी विजग्रहण केंद्रामध्ये बे-ब्रेकर यंत्रणा बसविणेच्या कामाचे पर्यवेक्षण शुल्क र.रू.१,६५,८००/- (अक्षरी र.रू.एक लाख पासष्ठ हजार आठशे फक्त) म.रा.वि.पारेषण कं. यांना अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १०१२१ विषय क्रमांक – २१

दिनांक – ११/०८/२०२१ विभाग – अणुविद्युत व दुरसंचार

सुचक – मा. अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा. सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.अति.आयुक्त (१) यांचे पत्र क्र. दुरसंचार/३/कावि/७६/२०२१, दि.०३/०८/२०२१

मा.अति.आयुक्त (१) यांनी शिफारस केले प्रमाणे.

विषय - अनुविद्युत व दूरसंचार VHF, UHF विभागाकडील VHF, UHF वायरलेस लायसन्स नुतणीकरण करणे बाबत.

विषय क्र.२१ दप्तरी दाखल करण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १०१२२ विषय क्रमांक – २२

दिनांक – ११/०८/२०२१ विभाग – स्थापत्य PMAY प्रकल्प

सुचक – मा. अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा. सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. स्था/PMAYप्र/३८६/२०२१, दि.०४/०८/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत शहरामध्ये सर्वांसाठी घरे कृती आराखडा (HFAPoA) व वार्षिक अंमलबजावणी आराखडा (AIP) तयार करुन त्याची अंमलबजावणी करणेकरिता शहरस्तरिय तांत्रिक कक्ष City Level Technical Cell (CLTC) या अभियानांतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकरिता केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार तज्ञांची (चार) नियुक्ती करण्यास शासन निर्णय क्रमांक प्रआयो/२०१५/प्र.क्र.११०/गृनिधो-२ (सेल), दि.०९/१२/२०१५ अन्वये एजन्सी नेमणेकामी मा.आयुक्त सो. यांचे दि.०६/१२/२०१६ च्या प्रस्तावान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यास अनुसरुन दि.०९/०१/२०१८ रोजीचे आदेशान्वये मे.क्रिसील रिस्क अँण्ड इन्फ्रास्ट्रक्चर सोल्युशन्स लि. मुंबई यांची प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत

प्रकल्पांसाठी कृती आराखडा (HFAPoA) व वार्षिक अंमलबजावणी आराखडा (AIP) तयार करुन त्याची अंमलबजावणी करणेकामी नेमणूक करणेत आलेली आहे. दि.२१/१०/२०२० रोजीचे मंजूर प्रस्तावानुसार मा.आयुक्त सो. यांनी मे.क्रिसील रिस्क अँण्ड इन्फ्रास्ट्रक्चर सोल्युशन्स लि. चे संपुर्ण काम स्थापत्य PMAY प्रकल्प विभागाचे नियंत्रणात करणेकामी मान्यता दिलेली आहे. सदर शहरस्तरिय तांत्रिक कक्ष City Level Technical Cell (CLTC)ला केंद्रशासनाकडून प्रति महिना र.रु.७०,०००/- प्रति कर्मचारी प्रमाणे ४ कर्मचा-यांसाठी र.रु.२,८०,०००/- अनुदान महानगरपालिकेस प्राप्त होतो. मा.स्थायी समितीने मे.क्रिसील रिस्क अँण्ड इन्फ्रास्ट्रक्चर सोल्युशन्स लि. यांचे विषयांकित कामाची मुदत दि.०७/०१/२०२१ रोजी संपत असल्याने ६ महिन्याचे मुदतवाढ (दि.०७/०७/२०२१ पर्यंत) देणेस मान्यता दिलेली होती. या दरम्यानच्या कालावधीत सदर काम करणेकामी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत निविदा मागविण्यात आलेली होती. सदर कामाकरिता फक्त एकाच संस्थेने निविदा भरल्याने सदर निविदेस तीन वेळा मुदतवाढ देण्यात आली होती. तिस-या मुदतवाढीमध्ये सुध्दा फक्त एकाच निविदा धारकाने (मे.क्रिसील रिस्क अँण्ड इन्फ्रास्ट्रक्चर सोल्युशन्स लि.) निविदा भरल्याने निविदा नियमानुसार सदरचे काम त्यांना देण्याचे ठरले आहे. परंतू, सदरची निविदा कार्यवाही पुर्ण होवून त्यांना कार्यारंभ आदेश देण्यास उशीर होणार आहे. दि.२७/०७/२०२१ रोजीचे पत्रान्वये मे.क्रिसील रिस्क अँण्ड इन्फ्रास्ट्रक्चर सोल्युशन्स लि. यांनी सदर कामाची मुदत दि.०७/०७/२०२१ रोजी संपत असल्याने २ महिन्यांची (दि.०७/०९/२०२१ पर्यंत) मुदतवाढ देणेबाबत मागणी केलेली आहे. पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत च-होली, रावेत, बो-हाडेवाडी, आकुर्डी आरक्षण क्र.२८३ व पिंपरी आरक्षण क्र.७७ येथे प्रकल्प राबविण्यात येत आहेत. सद्यस्थितीत सदर प्रकल्पांचे काम प्रगतिपथावर आहेत. तसेच सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावरील परवडणारी घरे (PPP) योजना चालू आहे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घरे (EWS) व बेघरांसाठी घरे (HDH)अंतर्गत आरक्षित असलेल्या जागांवर प्रधानमंत्री आवास योजना राबविण्याचे नियोजन आहे. मे.क्रिसील रिस्क अँण्ड इन्फ्रास्ट्रक्चर सोल्युशन्स लि. यांचेमार्फत सदर प्रकल्पांसाठी केंद्र व राज्य शासन यांचेकडून अनुदान प्राप्त होणेकामी पाठपुरावा करणे, उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करणे, योजनेशी निगडीत शासनाशी पत्रव्यवहार करणे इ. कामे करण्यात येतात. तथापि, पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत प्रकल्पांची कामे सन २०२२ पर्यंत चालू राहणार असल्याने मे.क्रिसील रिस्क अँण्ड इन्फ्रास्ट्रक्चर सोल्युशन्स लि. यांना सद्यस्थितीत २ महिन्यांसाठी प्रति महिना र.रु.५,१०,८९४/- (अक्षरी र.रु.पाच लाख दहा हजार आठशे चौ-याण्णव फक्त) प्रमाणे मुदतवाढ देणेबाबत तसेच शहरस्तरिय तांत्रिक कक्ष City Level Technical Cell (CLTC) चे काम करणेकरिता मे.क्रिसील रिस्क अँण्ड इन्फ्रास्ट्रक्चर सोल्युशन्स लि. यांना प्रति महिना देय र.रु.५,१०,८९४/- नुसार २ महिन्यांसाठी एकुण र.रु.१०,२१,७८८/- (अक्षरी र.रु.दहा लाख एकवीस हजार सातशे अठ्याऐंशी फक्त) प्रमाणे मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१२३ विषय क्रमांक- २३

दिनांक- ११/०८/२०२१ विभाग- स्थापत्य ब मुख्यालय

सुचक- मा. अंबरनाथ कांबळे अनुमोदक- मा. सुवर्णा बुर्डे

संदर्भ- मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र. स्था/नि/२-ब/९४९/२०२१, दि.०३/०८/२०२१

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.46/54/2020-21 अन्वये प्रभाग क्र.१६ मधील शिंदेवस्ती, जाधववस्ती व गुरुद्वारा परिसरातील ओपन गटार बंदिस्त करणे व स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.विराज प्रविण नाणेकर नि.र.रू.41,50,209/- (अक्षरी र.रु.एक्केचाळीस लाख पंन्नास हजार दोनशे नऊ फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.41,13,259/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.41,13,259/- पेक्षा 12.77% कमी म्हणजेच र.रु.35,87,996/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.3,193/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.36,950/- = एकुण र.रु.36,28,139/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १०१२४ विषय क्रमांक – २४

दिनांक – ११/०८/२०२१ विभाग – पाणी पुरवठा

सुचक – मा. अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा. सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र. पापु/८/कावि/२४६/२०२१, दि.०४/०८/२०२१

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.01/10/2021-22 अन्वये पिंपरी चिंचवड शहरातील पाणी नमुने त्रयस्थ संस्थेमार्फत तपासणी करून घेणे अनुषंगिक कामे करणेकामी मे.स्पॅन हायड्रोटेक़ नि.र.रू.41,65,740/- (अक्षरी र.रू. एकेचाळीस लाख पासष्ठ हजार सातशे चाळीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.41,65,740/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.41,65,740/- पेक्षा 21% कमी म्हणजेच र.रु.32,90,935/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.0/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.32,90,935/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस,

भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक – १०१२५ विषय क्रमांक – २५

दिनांक – ११/०८/२०२१ विभाग – स्थापत्य ब मुख्यालय

सुचक – मा. अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा. सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र. स्था/नि/२-ब/९५०/२०२१, दि.०४/०८/२०२१

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे.

